किनगाव जटू येथे घाणीचे साम्राज्य- तक्रार दाखल >>पान 2

गोंदियाच्या साईटोला जिल्हा परिषद शाळेच्या जीर्ण इमारतीला पालकांनी ठोकले कुलूप >>पान 3

बुलढाण्यात कॅन्सरचा धोका वाढविणाऱ्या कागदी कपांवर बंदी >>पान 4

**सुविचार**
सौजन्याने वागल्यास मनःशांती मिळते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 143 ■ शनिवार, दि. 04 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला 'स्थळ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला
आतील पान

# फडणवीस, भुजबळ पुन्हा एकत्र

## ■ एकाच गाडीतून प्रवास, भाषणात एकमेकांचे कौतुक!
## ■ नायगावमध्ये सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीचे निमित्त

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी : मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर आज सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त साताऱ्याच्या नायगावातील कार्यक्रमात छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीस पुन्हा एकत्र आल्याचे दिसून आले. या कार्यक्रमात छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीस यांनी एकमेकांचे कौतुकही केले. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**



छगन भुजबळ यांच्या पुढाकाराने काही वर्षांपूर्वी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम नायगावात सुरू झाला होता. छगन भुजबळ हे दरवर्षी नायगावात येतात. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या ठिकाणी येण्याचा निर्णय घेतला. नायगाव येथील कार्यक्रमात जाताना देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांनी एकाच गाडीने प्रवास केला. त्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

यानंतर झालेल्या सभेत छगन भुजबळ म्हणाले की, हरी नरके इथे मला घेऊन आले आणि सांगितले की या पडक्या वाड्यात सावित्रीबाईंचा जन्म झाला आहे. त्यानंतर इथे स्मारक उभारायचे आम्ही ठरवले. मी त्यावेळी विधानपरिषदेचा आमदार होतो. तो निधी इथे वापरायचे ठरवले. सावित्रीबाईंना शेणाचे गोळे तुम्ही आणि सगळ्यांनी मारले, फक्त ब्राम्हणांनी नाही. फुलेंना काही ब्राम्हणांनी जसा विरोध केला तसा काहींनी मदतही केली. ज्या वाड्यात पहिली शाळा सुरु झाली ते भिडे ब्राम्हणच होते. देवेंद्रजी तुम्ही सावित्रीबाईंचे काम पुढे नेत आहात, म्हणून तुमचे धन्यवाद. विधीमंडळाच्या सभागृहाच्या समोर फुलेंची प्रतिमा लावण्याचे, महाज्योतीच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्याचे काम तुम्ही आणि एकनाथ शिंदे यांनी केले. भिडे वाड्याचे काम सुरु झालंय. मात्र कामाला धक्का देण्याची गरज आहे. सावित्रीबाईंच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार बंद आहे. तो पुन्हा सुरु व्हावा. वाकिफ कहाँ जमाना हमारी उडान से, वो और थे जो हार गए आसमान से, असे शेरोशायरी त्यांनी यावेळी केली.

भुजबळांनंतर देवेंद्र फडणवीस यांनी भाषणातून शेरोशायरी करत त्यांचे कौतुक केले. मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया, अशा प्रकारे तुम्ही काम सुरु केले त्यानंतर हळूहळू कारवाँ बनायला लागला आणि काम पुढे जायला लागले. आज एक चांगले स्वरूप आपल्याला इथे पाहायला मिळत आहे. पण मी तुमचे याकरिता अभिनंदन करेल की, या ठिकाणी प्रेरणास्थळ झाले पाहिजे हे तुम्ही ओळखले आणि त्याची सुरुवात तुम्ही केली. यामुळे तुमचे मनापासून अभिनंदन, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी छगन भुजबळ यांचे कौतुक केले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीदिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीदिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केले. सागर या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही अभिवादन केले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

यावेळी राज्यपालांच्या सचिव श्वेता सिंघल, राज्यपालांचे परिवार प्रबंधक जितेंद्र वाघ तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनी मंत्रालयात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी मंत्रालयात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीदिनी मंत्रालयात अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी मंत्रालयात सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. मुख्य सचिव सुजाता सौनिक मुख्यमंत्री यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनीही पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी उपस्थित महिलांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा शिक्षणाचा व समाजसुधारणेचा वारसा समर्थपणे पुढे नेत असल्याबद्दल पुष्प देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, अवर सचिव सचिन कावळे, एससी/ एसटी कर्मचारी संघटनेचे भारत वानखेडे यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही सावित्रीब

# वाल्मिक कराडला स्पेशल ट्रिटमेंट द्यायला कोर्टाचा नकार



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** पवनचक्कीला दोन कोटी रुपयांच्या खंडणीच्या मागणीच्या गुन्ह्यातील आरोपी, तसेच बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या प्रकरणाचा ठपका असलेला वाल्मिक कराड याने न्यायालयाकडे याचिका दाखल केली होती. त्यामध्ये त्याने आपल्याला एक स्लीप ॲप्निया नावाचा आजार असून त्यासाठी आपल्याला एक मदतनीस मिळावा अशी मागणी या याचिकेतून केली होती. ती मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. वाल्मिक कराड यांची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे, खाजगी व्यक्तीकडून वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी त्याने याचिका दाथल केली होती. मात्र, असा खाजगी व्यक्ती कोठडीत असलेल्या आरोपी सोबत ठेवता येणार नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे.

२४ तास मदतनीस देण्याची मागणी

वाल्मिक कराडकडून न्यायालयात याचिका दाखल केली असल्याची माहिती होती. वाल्मिक कराडने आपल्याला स्लीप ॲप्निया नावाचा आजार असल्याचा दावा केला आहे. ऑक्सीजनसारखं मशीन त्याला दररोज लावलं जात ते चालवण्यासाठी आपल्याला सीआयडी कोठडीत २४ तास मदतनीस देण्याची मागणी कराडने केली होती. रुग्णाला अशावेळी ऑटो सीपॅप ही मशीन झोपताना लावली जाते. मशीन लावण्यासाठी मदतनीस हवा असल्याची न्यायालयाकडे विनंती केली होती.

सलग तिसऱ्या दिवशी चौकशी सुरू

वाल्मिक कराड याची तिसऱ्या दिवशी सीआयडी चौकशी सुरू आहे. केज शहरात सीआयडी कडून चौकशी सुरू आहे. बीड शहरातील शहर पोलीस स्टेशनमध्ये सीआयडी कस्टडीत असलेल्या वाल्मीक कराडची तिसऱ्या दिवशी सीआयडीने चौकशी चालू ठेवली आहे.

## 'स्लीप एपनिया' आजार नेमका काय?

*आरोग्य तज्ज्ञांच्या मते, स्लीप एपनिया ही एक गंभीर समस्या आहे, या समस्येने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला झोपेच्या वेळी श्वास घेणे बंद होते. तुमचा मेंदू पुरेसा जागृत राहून तुमचे रक्षण करण्याचे काम करत असताना, ही समस्या तुमच्या झोपेत व्यत्यय आणते. स्लिप एपनियासारख्या गंभीर समस्येवर वेळेवर उपचार मिळणे फार महत्वाचे आहे, कारण कालांतराने ही स्थिती गंभीर गुंतागुंत होण्याचे प्रमुख कारण बनू शकते. जर तुम्ही यावर योग्य उपचार केले तर स्लिप एपनियासारख्या गंभीर समस्यांपासून सहज सुटका मिळवू शकता, कारण स्लिप एपनिया सारखी स्थिती पूर्णपणे नियंत्रित केली जाऊ शकते. स्लिप एपनिया सारख्या परिस्थिती उद्भवण्याची मुख्य कारणे कोणती आहेत ते जाणून घेऊया.*

***कोणत्या लोकांना स्लीप एपनियाचा धोका जास्त असू शकतो?***

- *सामान्यत:, जास्त वजन आणि लठ्ठपणामुळे ग्रस्त असलेल्या लोकांमध्ये त्याचा धोका जास्त असतो.*
- *अनुवांशिक किंवा कौटुंबिक समस्या असलेल्यांना मोठ्या प्रमाणात धोका असू शकतो.*
- *संशोधनानुसार, झोपेशी संबंधित या समस्या महिलांपेक्षा पुरुषांमध्ये जास्त आढळतात.*
- *टॉन्सिल्स असलेल्या काही मुलांमध्येही या प्रकारची समस्या दिसून येते.*


## मुंबईत सीबीआयच्या अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** भ्रष्टाचार व अन्य गैरप्रकारांना थारा न देण्याच्या आपल्या धोरणानुसार सीबीआयने आपल्याच एका पोलिस उपनिरीक्षक आणि इतरांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. पदाचा गैरफायदा घेऊन तपासादरम्यान विविध व्यक्तींकडून अवाजवी फायदा मिळवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या सरकारी अधिकाऱ्याने वेगवेगळ्या मध्यस्थांच्या मार्फत वेब अकाउंटस व हवाला चॅनेलद्वारे लाच घेतल्याचा आरोप प्रथम माहिती अहवालात नोंदवण्यात आला आहे.

एफआयआर नोंदवल्यानंतर जयपूर, कोलकता, मुंबई व नवी दिल्लीतल्या २० ठिकाणी छापे टाकण्यात आले. या छाप्यातून ५५ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम हवालाच्या माध्यमातून वळविण्यात आली होती. याशिवाय सुमारे १.७८ करोड रुपयांची गुंतवणूक दर्शविणारी मालमत्तेची कागदपत्रे, १.६३ करोड रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याच्या नोंदी तसेच काही बेकायदेशीर कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहेत.

## शिर्डी विमानतळावर लवकरच नाईट लॅन्डींग सुविधा

**शिर्डी/प्रतिनिधी :** साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगामी काही दिवसातच नाईट लँडींग विमानसेवा पूर्ण क्षमतेनं सुरू होईल. तसेच या विमानतळावरून देशांतर्गत सेवा वाढवण्याबरोबरच



अंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. सामान्य साईभक्तांना विमानसेवेचा लाभ घेता यावा, यासाठी शिर्डी एअरपोर्ट उडाण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी दिली.

शिर्डी विमानतळावर लवकरच नाईट लॅन्डींग : केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी शिर्डीत येवून साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. दर्शनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना केंद्रीय मंत्री मोहळ म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटून शिर्डी एअरपोर्ट बाबतच्या अडचणी सोडवण्याबाबत विनंती केली. त्यानुसार अमित शाह यांनी मागील आठवड्यातच शिर्डी एअरपोर्टसाठी सीआयएसएफचे मनुष्यबळ वाढवून देण्याचे निर्देश दिले आहेत. नाईट लँडींगबाबत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर करून पंधरा दिवसात शिर्डीतून विमानांची नाईट लँडींग आणि टेकऑफ सुरू होईल.''

# अटक केलेल्या आरोपींना बीड जिल्ह्यात ठेवू नये-भाजपा आमदार सुरेश धस यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात राज्य सरकारच्या आदेशानुसार एसआयटी आणि सीआयडी चौकशी सुरू आहे. असे असले तरी विरोधकांसह भाजपा आमदार सुरेश धस हे बीडमधील कायदा- सुव्यवस्थेसह एसआयटी चौकशीवर समाधानी नसल्याचं चित्र आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी वाल्मिक कराडची 'ऑन कॅमेरा' चौकशी करण्याची मागणी केली. कराडच्या खोलीत सीसीटीव्ही बसवावा, असे दमानिया यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटलं. वाल्मिक कराड कोठडीत असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये पलंग आणण्यात आल्यानं पोलिसांवर विरोधकांकडून टीका करण्यात आली होती. त्यावर सामाजिक कार्यकर्त्या दमानिया यांनी म्हटलं, ''खूप खोटं बोललं जात आहे. पोलिसांना आराम करण्यासाठी पलंग आले. हे कुणालाच पटणारं नाही''.

अटक केलेल्या आरोपींना बीडमध्ये ठेवू नये-''बीड जिल्ह्यात एका ठराविक समुदायाच्या अधिकाऱ्यांनी जास्त काळ सरकारी पदे भूषवली आहेत. त्यामुळे इतर समुदायाला दुर्लक्ष केले जात आहे, असे वाटते'', असा दावा भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी दावा केला. सरपंच देशमुख यांच्या हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडला सीआयडी कोठडी देण्यात आली आहे. त्यावरून विरोधी पक्षनेत्यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि राज्यमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यावर आमदार धस म्हणाले, ''मी त्यांचे नाव घेतलं नाही. तसेच त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली नाही''. ते पुढे म्हणाले, ''अटक केलेल्या आरोपींना बीड जिल्ह्यात ठेवू नये. कारण ते तपासावर परिणाम करू शकतात. त्यांची एकतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हर्सूल कारागृहात किंवा नाशिक कारागृहात बदली करावी''.

बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न- राष्ट्रवादीचे (एसपी) आमदार जितेंद्र



आव्हाड यांनी एक्स मीडियावर पोस्ट करत बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. ''मुंबईत अंडरवर्ल्डची दहशत संपविण्याचं श्रेय स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांना जाते. मात्र, बीडमध्ये इटलीमधील माफियांना लाजवेल इतकी भयानक दहशत आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या (अजित पवार) ताफ्यातील गाडी आरोपी पोलिसांसमोर हजर होण्यासाठी असेल तर हे धक्कादायक आहे''. पुढे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं, ''महाराष्ट्र हे बिहार नाही तर महाराष्ट्र आता आफ्रिकेतील सर्वाधिक क्राईम रेट असलेल्या पीटरमारित्झबर्ग शहराप्रमाणं झालं आहे. एखाद्या माणसाला उचलून न्यायचे आणि थेट गायबच करून टाकायचे, असे प्रकार फक्त आफ्रिकेत व्हायचे. तेच आता बीडमध्येही घडते, हे आता उघड होऊ लागले आहेत''.

## खराब हवेचा आरोग्यावर परिणाम

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे. मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात प्रामुख्याने सांगता येण्यासारखे कारणे म्हणजे वाढते औद्योकिकरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे ही आहेत. मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत. मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे. मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो. चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा. नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

# किनगाव जट्टू येथे घाणीचे साम्राज्य- तक्रार दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील किनगाव जट्टु येथील जि.प. प्राथमिक मराठी मुलांच्या शाळेजवळ मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र आहे.

कचरा घंटागाडी केवळ नावालाच असुन वित्त आयोग निधी केवळ कागदोपत्रीच खर्च होत असल्याचा आरोप सचिन नागरे यांच्याकडून होतो आहे. घरात शौचालय असुनही काही नागरिक प्रांतकाळी ( भल्या पहाटे) रस्त्याच्या कडेला शौचास बसतात.यामुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या टायरला घाण चिटकून संपूर्ण गावामध्ये घाण पसरल्याचे चित्र आहे.यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात असुन अनेक ठिकाणी घनकचरा उकिरडे साठलेले आहेत. गावात ठिकठिकाणी वाढते अतिक्रमण व मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरत असल्याकारणाने ग्रामपंचायत कर भरण्यासाठी अनेक नागरिक टाळाटाळ करित आहेत. बाबतीत कामे केवळ कागदावरतीच आहेत.

तरी वरिष्ठांनी याकडे लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थ सचिन नागरे यांच्याकडून होते आहे. तसेच याबाबतची तक्रार सुध्दा त्यांनी ईमेल व्दारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली आहे.




# आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला 'स्थळ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

## सचिन पिळगांवकर निभावणार महत्त्वाची भूमिका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**अनेक हिंदी, मराठी चित्रपटांमध्ये अभिनय, चित्रपटांचे दिग्दर्शन, गायन अशी पाच दशकांपेक्षा अधिक मोठी, बहुरंगी कारकिर्द गाजवणारे आणि मराठी चित्रपट सृष्टीत महागुरू म्हणून ओळखले जाणारे सचिन पिळगांवकर आता नव्या वर्षात नवी इनिंग सुरू करत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या धुन प्रॉडक्शन निर्मित आणि जयंत दिगंबर सोमलकर दिग्दर्शित 'स्थळ' या बहुचर्चित चित्रपटाची प्रस्तुती सचिन पिळगांवकर करणार आहेत. महिला दिनाचं औचित्य साधत ७ मार्चला 'स्थळ' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या जयंती निमित्त 'स्थळ' चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं आहे. शेफाली भूषण, करण ग्रोवर, रिगा मल्होत्रा आणि जयंत दिगंबर सोमलकर यांनी 'स्थळ' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. नंदिनी चिकटे, तारानाथ खिरटकर, संगीता सोनेकर, सुयोग ढवस, संदीप सोमलकर, संदीप पारखी, स्वाती उलमले, गौरी बदकी, मानसी पवार या नव्या दमाच्या कलाकारांचा अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे. दिग्दर्शक जयंत दिगंबर सोमलकर यांनी शॉर्ट फिल्म्ससह 'गिल्टी म ईंड्स' या गाजलेल्या वेब सीरिजचं सहदिग्दर्शन केलं होतं. 'स्थळ' हा त्यांचा पहिलाच मराठी चित्रपट आहे. अत्यंत प्रतिष्ठेच्या टोरंटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये या चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर झाला आणि तिथे त्याला सर्वश्रेष्ठ आशिया पॅसिफिक फिल्मसाठी ऱ्एऊइअण अवॉर्डसुद्धा मिळाला. त्यानंतर तब्बल २९ महत्त्वाच्या चित्रपट महोत्सवांम ध्ये हा चित्रपट दाखवला गेला आहे आणि १६ पेक्षा जास्त पुरस्कारही पटकावले आहेत. त्यामुळेच मराठी चित्रपटसृष्टीत या चित्रपटाविषयी उत्सुकता आहे.

सर्वप्रथम श्रियाने मामी फेस्टिवल मध्ये हा चित्रपट पाहिले होता. खास श्रियाच्या आग्रहास्तव अमेरिकेत 'नाफा' फिल्म फेस्टिवल मध्ये मी आणि सुप्रियाने 'स्थळ' हा चित्रपट पाहिला. त्यावेळीच हा चित्रपट आम्हा दोघांनाही प्रचंड आवडला होता.म हाराष्ट्रातील मातीत रूजलेल्या या चित्रपटाला अमेरिकेच्या मराठी लोकांनी डोक्यावर घेतलेले पाहून, चित्रपट प्रदर्शित करताना काही मदत लागल्यास आवर्जून सांगा असे निम िता, दिग्दर्शक जयंत सोमलकर यांना आम्ही सांगितले. 'स्थळ' चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक यांनी म ला चित्रपटाची प्रस्तुती करण्यास विचारले आणि मी लगेच होकर दिला. चांगली संहिता ही रसिक प्रेक्षकांपर्यंत अवश्य पोहचली पाहिजे यासाठी मी या चित्रपटाची प्रस्तुती करण्याचे ठरविले असे चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते सचिन पिळगांवकर यांनी सांगितले.

## 'दर्पण 'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे व्याख्यान

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनाला अर्थात ६ जानेवारीला सोमवारी जिल्हा माहिती कार्यालयाने पत्रकार दिनाचे आयोजन केले आहे. नियोजन भवन येथे दुपारी ४ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि बातमीदारी ' या विषयावर पत्रकारांना संबोधित करणार आहेत.

नांदेड जिल्हा प्रशासन, नांदेड पोलीस प्रशासन, जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटना व जिल्हा माहिती कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दर्पण दिनाच्या पर्वावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

६ जानेवारी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचा जयंती दिवस.मराठी पत्रकार दिन म्हणून सर्वत्र साजरा होतो. या दिनाचे औचित्य साधून पत्रकारांसोबत प्रशासनाचा संवाद आयोजित करण्यात आला आहे. यावेळी 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बातमीदारी ', या विषयावर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा बातमीदारीमध्ये कशा पद्धतीने वापर करता येईल, त्याचे फायदे व तोटे याबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपस्थित राहणार असून ते देखील पत्रकारांशी संवाद साधणार आहेत.

सोमवार दिनांक ६ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता जिल्ह्यातील विविध संघटनांशी, माध्यम संस्थांशी, केंद्रांशी संबंधित सर्व प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातील पत्रकार बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी केले आहे.






## 'सावित्रीबाई फुले' यांच्या जयंती निमित्त 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची विशेष मुलाखत



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'सावित्रीबाई फुले' यांच्या जयंती दिनानिमित्त विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत दोन भागात प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५ रोजी तर दुसऱ्या भागाचे मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारण होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. निवेदिका डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी लढा दिला. अस्पृश्यता, बालविवाह, सती प्रथा यासारख्या वाईट गोष्टींना त्यांनी विरोध केला. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे तसेच स्त्रियांचा आत्मविश्र्वास वाढवणे गरजेचे आहे, हे सावित्रीबाईंनी ओळखले. यासाठी त्यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्यासह मोठी कामगिरी बजावली. त्यांचे योगदान आणि विचार आजच्या समाजासाठी कसे मार्गदर्शक आहेत. याविषयी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी माहिती दिली आहे.









DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गोंदियाच्या साईटोला जिल्हा परिषद शाळेच्या जीर्ण इमारतीला पालकांनी ठोकले कुलूप







दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातील साईटोला येथील जिल्हा परिषद शाळेच्या जीर्ण इमारतीला पालकांनी आज कुलूप ठोकले आहे. जोपर्यंत इमारत दुरुस्त होणार नाही व नवीन इमारतीचा प्रस्ताव पाठविला जाणार नाही तोपर्यंत आपल्या पाल्यांना शाळेच्या पटांगणात मंडप टाकून शिक्षण देऊ अशी भूमिका पालकांनी घेतली आहे. साईटोला येथे पहिली ते चौथी पर्यंत शाळा आहे. काल विद्यार्थी वर्गात असताना अचानक स्लॅबचा प्लास्टर विद्यार्थ्यांच्या डोक्यावर पडल्याने एक विद्यार्थी जखमी तर तिघे किरकोळ जखमी झाले होते. या शाळेत चार वर्ग असून केवळ एकच इमारत आहे ती सुद्धा इमारत जीर्ण झाल्याने पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेच्या पटांगणातच बसवून शिक्षण देण्याच्या निर्णय घेतला आहे. जोपर्यंत इमारत पूर्णतः दुरुस्त होणार नाही तोपर्यंत पालक त्यांच्या पाल्यांना त्या इमारतीत बसवणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

## महत्त्वाचे...

### शेतात खेळणाऱ्या बालिकेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगावच्या चाळीसगावमधील रांजणगाव शिवारात शेतातील लिंबूच्या बागेत खेळणाऱ्या ४ वर्षाच्या बालिकेवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा मृत्यू झाला. रसला पावरा असे मृत बालिकेचे नाव आहे. गेल्या चार महिन्यांत बिबट्याच्या हल्ल्यातील हा तिसरा बळी आहे. दरम्यान, बिबट्याला पकडण्यासाठी घटनास्थळी वनविभागाने १० ट्रॅप कॅमेरे, ४ पिंजरे लावले असून, १५ कर्मचाऱ्यांचे पथक गस्त घालत आहे.

### माळेगावात पारंपारिक लोककला महोत्सवात कलाकारांनी जिंकली रसिकांची मने; लोककला महोत्सवाचे आ. प्रतापरावरा पाटील चिखलीकर यांचे हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातल्या मातीत जन्मलेल्या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी माळेगाव यात्रेत पारंपारिक कलामहोत्सवाची सुरुवात केली आहे. पारंपारिक लोककलांचे संवर्धन व कलाकरांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय असून, कलाकारांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.


माळेगाव यात्रेत आज वैभव असलेल्या पारंपारिक लोककला महोत्सवाचे उद्घाटन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा कृषी अधिक्षक कृषी अधिकारी ब-हाटे, पोलीस निरिक्षक संजय निलपत्रेवार, आनंदराव पाटील ढाकणीकर, शंकरराव ढगे, रोहित पाटील, सचिन पाटील चिखलीकर, नरेंद्र गायकवाड, भगवानराव राठोड, लक्ष्मण भालके, सरपंच प्रतिनिधी हनुमंत धुळगंडे, बालाजी कदम आदींची यावेळी उपस्थिती होती.

पुढे ते म्हणाले, माळेगाव यात्रेत कायमस्वरूपी सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात येणार असून, जिल्हा नियोजन समितीकडून भरीव निधी उपलब्ध करून घेतला जाईल, असेही ते म्हणाले. यावेळी जुन्या काळातील तमासगीर अशाताई सुकळकर, शाहीर रमेश गिरी, कलावंत लच्छु देशमुख यांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन आ. चिखलीकर यांच्या हस्ते महोत्सवाची सुरुवात शाहीर रमेश गिरी यांच्या महाराष्ट्र गीतने झाली. यावेळी रघुवीर खेडकर नाट्य मंडळ, पांडुरंग मुळे नाट्य मंडळ, आनंद लोकनाट्य मंडळ, सविताराणी पुणेकर, हरीभाऊ बडे नगरकर व शिवकंन्या बडे नगरगर यांसह विविध कलाकारांनी गण गवळण, बतावणी, रंगबाजी, लावणी व इतर पारंपारिक कला सादर करून रसिकांची मने जिंकली. माळेगाव यात्रेतील पारंपारिक लोककला महोत्सवाने जिल्ह्यातील सांस्कृतिक वारशाला एक नवा आयाम दिला आहे. या महोत्सवातून महाराष्ट्रातील लोककलेचे महत्व अधोरेखित होत आहे.

### पती-पत्नीतील वाद विकोपाला, पतीने पत्नीची हत्या करून मृतदेह घरात दडवला, अन्...; अमरावती हादरली

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या प्रभू कॉलनी परिसरात पतीने पत्नीची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पत्नीचा मृतदेह घरात दडवून पती पसार झाला आहे. पोलिसांकडून पतीचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणामुळे अमरावती शहरात मोठी खळबळ उडाली आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भाग्यश्री अक्षय लाडे ही विवाहित युवती पती अक्षय सोबत वादविवाद झाल्याने माहेरी राहायला आली होती. काल रात्री सायंकाळी ती प्रभू कॉलनी येथे दुचाकी वाहनाने कपडे आणायला गेली. मात्र, रात्रभर घरी न आल्याने भाग्यश्रीच्या आईने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात भाग्यश्री बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. फ्रेजरपुरा पोलिसांच्या पथकाने तातडीने दखल घेत भाग्यश्रीचा फोन ट्रेस केला असता भाग्यश्रीचे दुचाकी वाहन हे रेल्वे स्टेशन परिसरात आढळून आले. त्यातच तिचा फोन देखील होता. पोलिसांनी रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्यात सदर वाहन हे भाग्यश्रीचा पती अक्षय लाडे यानेच रेल्वे स्टेशनपर्यंत आणल्याचे निष्पन्न झाले.

पत्नीचा मृतदेह घरात दडवून पती पसार

या आधारे पोलिसांनी तत्काळ भाग्यश्रीचे प्रभू कॉलनी येथील घर गाठले असता घराला कुलूप लावलेले होते. मात्र पोलिसांना शंका आल्याने त्यांनी दाराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यावेळी भाग्यश्री ही बेडरूममध्ये मृत पडलेली दिसली. तसेच तिच्या मानेवर चाकूने आणि हाता पायावर देखील वार केल्याचे दिसून आले. पत्नीचा मृतदेह घरात दडवून पती पसार झाला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून भाग्यश्रीचा पती अक्षय लाडेच्या अटकेसाठी पोलिसांनी पथक रवाना केलेली आहेत. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा यासाठी सकल मराठा समाज शैक्षणिक मंचाचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बीड येथील माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण व परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणा या दोन्ही प्रकरणाच्या निषेधार्थ आज सकल मराठा समाज शैक्षणिक मंचाच्या वतीने क्रांती चौकामध्ये आंदोलन करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचा अत्यंत कृरपणे खून करण्यात आला. तसेच दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.

या प्रकरणातील आरोपी आज सुद्धा मोकाट फिरत आहेत. या आरोपींना अटक व्हावी व या प्रकरणाचा तपास निपक्षपणे करावा या मागण्या या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत.

## मेसाई जवळगाचे सरपंच नामदेव निकम यांनी शस्त्र परवाना मिळावा यासाठी स्वत: वरील हल्ल्याचा रचला बनाव



दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** राज्यात बीड जिल्ह्यातील माजी सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची घटना गाजत असतानाच धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यामध्ये पवनचक्की कंपनीच्या गुंडांची दहशत समोर आली. याचाच फायदा घेत मेसाई जवळगा येथील सरपंच नामदेव निकम यांनी स्वतः ला आत्मसंरक्षणासाठी शस्त्र परवाणा मिळावा म्हणून दोन मोटरसायकल स्वारांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग करत दगड मारून पेट्रोलचे गोळे व अंडे फेकून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा बनाव केल्याचे उघड झाले आहे. तशी फिर्यादीनेच कबुली दिल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी दिली आहे. या प्रकरणाला धार मिळावी म्हणून सरपंच व ग्रामस्थांनी शोले स्टाईल आंदोलनही केले होते. फिर्यादी सरपंच नामदेव निकम यांनी संगितलेली माहिती व प्रत्यक्ष स्थळी असलेली परिस्थिती



वेगळी असल्याने पोलिसांनी सखोल तपास केला असता त्यांनी बनावाची कबुली दिली. पुढील तपास सुरू असून कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी सांगितले आहे.

## रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी स्वीकारला पदभार

### रोजगार हमीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचा नवा आदर्श निर्माण करणार - रोजगार हमी मंत्री भरत गोगावले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रोजगार हमी योजना ही ग्रामीण विकासासाठी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यात ग्रामीण विकासाचा एक नवा आदर्श तयार करण्यासाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भारत गोगावले यांनी केले. रोजगार हमी फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री श्री. गोगावले यांनी मंत्रालयात विभागाचा पदभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते.

रोजगार हमी मंत्री श्री.गोगावले म्हणाले की, रोजगार हमी कामांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील गावांमध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. तोच पॅटर्न राज्यात राबवून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात, विशेषतः ग्रामीण भागात 'रोजगार हमी' मुळे बदल होत आहेत. या बदलांची गती वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी मंत्री श्री. गोगावले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. रोजगार हमी विभागातील व मंत्री कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## वातावरणीय बदलामुळे हळद पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव



दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी :** हिंगोली जिल्हा हळद उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो कारण येथील बहुतांश शेतकरी हे हंगामी पिकाला भाव मिळत नसल्याने हळद शेतीकडे वळले आहेत. हळदीची मागणी वाढत असल्याने येथील शेतकरी हळदीची लागवड करतात. परंतु यावर्षी वातावरणातील बदलामुळे हळद पिकांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. अनेक वेळा औषध फवारणी करुनही करपा रोग कमी होत नसल्यामुळे उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे हळद उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. कृषी विभागाकडून मार्गदर्शन तसेच शासनाकडून मदत मिळावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.

## मराठवाडा बहुजन विकास आघाडीच्यावतीने गोदावरी पाटबंधारे विभाग कार्यालयासमोर निदर्शने




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** २००५ च्या समन्यायी पाणी वाटप कायदा व मेंढेगिरी समितीच्या शिफारशीचे व सूत्र बदलून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सादर केलेला अहवाल त्वरित रद्द करण्यात यावा यासाठी मराठवाडा बहुजन विकास आघाडीच्या वतीने गोदावरी पाटबंधारे विभाग कार्यालयासमोर आज निदर्शने करण्यात आली. मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्प हा १५ नंबर पर्यंत ६५ टक्के भरला नसेल तर उर्ध्व भागातून समन्यायी पाणी वाटप कायद्याच्या आदेशाद्वारे जायकवाडी प्रकल्पात पाणी सोडण्याचे आदेश आहेत.

तसेच माननीय उच्च न्यायालय मुंबईचा निकाल व मेंढेगिरी समिती अभ्यास २०१३ च्या शिफारशी तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश व समन्यायी पाणी वाटप कायदा २००५ इत्यादी कायदे मराठवाड्याच्या बाजूने असतानाराज्य सरकारने २६ जुलै २०२३ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची नियुक्ती केली. सदरील अभ्यास गटात मर्जीतील अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्याने सदरील अभ्यास गटांनी समन्यायी पाणी वाटप २००५ चे सूत्र बदलून हा कायदा मोडीत काढण्याच्या दृष्टीकोनातून मेंढेगिरी समितीचा निष्कर्ष हा प्रचलित नियमानुसार असून देखील ही अभ्यास गटाने मेंढेगिरी समितीच्या अहवालावर प्रश्न्नचिन्ह निर्माण करून मेंढेगिरी समितीने सुचविलेल्या शिफारशी रद्द होण्याच्या दृष्टीने अभ्यास गटांनी महाराष्ट्र शासनाने अहवाल सादर केला आहे.

हा अहवाल मराठवाड्याच्या विरोधात असल्याने समन्यायी पाणी वाटप कायद्याद्वारे मराठवाड्याला पाणी मिळणारे ६५ टक्के वरून ५७% झाल्यामुळे मराठवाड्याचे स्वाभाविकच पाणी कमी झाले आहे ही बाब मराठवाड्यासाठी अत्यंत खेदाची आहे अशी प्रतिक्रिया मराठवाडा भोजन विकास आघाडी अध्यक्ष रमेश गायकवाड यांनी दिली आहे.

## विविध वृत्त...

### ६ जानेवारीला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार जानेवारी महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी कळविले आहे.

### अन्न व औषध प्रशासन कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन बुलढाणा येथे आत क्रांतीज्योती सावित्राबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमांचे अध्यक्ष अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त प्र.शि.पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पन करुन सावित्राबाई फुले यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी जी.के. वसावे, रोखपाल एम.जे. खुर्दे, प्रमुख लिपीक जयंत झोपे, श्रीकांत मोरे तसेच कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### बुलढाण्यात बारदान्या अभावी शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र बंद; सुरु न झाल्यास ठाकरेंची शिवसेना छेडणार आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** गेल्या वर्षभरापासून सोयाबीन हमीभावावरून नाराज शेतकऱ्यांना आता खरेदी केंद्रांवरही अडचणीचा सामना करावा लागतो आहे. बारदाना तुटवड्याने बुलढाण्यातील अनेक सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रच बंद असून शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र चालकांनाही ही खरेदी पूर्वपदावर कधी येणार याबाबत कल्पना नाही. सरकारी सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र गेल्या १२ दिवसांपासून बंद असून बुलढाणा जिल्ह्यातील अनेक खरेदी केंद्रांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. त्यामुळे आज शिवसेनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत दोन दिवसात खरेदी केंद्र सुरु करावे अन्यथा शिवसेना आंदोलन छेडणार असल्याचे उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी सांगितले आहे.



# बुलढाण्यात कॅन्सरचा धोका वाढविणाऱ्या कागदी कपांवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नगरपालिकांना दिले कारवाईचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कॅन्सरसारख्या भयंकर आजारांना निमंत्रण देण्यास कारणीभूत ठरणाऱ्या चहा पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कागदी कपांवर बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी ७ नोव्हेंबर रोजी दिले. मात्र अद्यापही या आदेशाची संबंधित यंत्रणांच्या विभागप्रमुखांकडून कुठेच अंमलबजावणी झालेली नाही. तर दुसरीकडे मात्र चहाच्या अनेक दुकानांवर सर्रास कागदी कपांचा वापर होताना दिसत आहे.

बीपीए या केमिकलचा वापर करून चहाचे कागदी कप बनविले जातात. कागदी कपात गरम चहा किंवा पाणी टाकल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते आणि चहासोबत लाखो मायक्रो प्लास्टिक कण पोटात जातात. यामुळे हजारो नागरिकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागू शकते. त्यासाठी कागदी कपांवर बंदी घालण्याची मागणी आझाद हिंद संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीशचंद्र रोठे यांनी ऑक्टोबर महिन्यात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे केली होती. त्याची तत्काळ दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी कागदी कपांवर बंदी घालण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदारांनी ७ नोव्हेंबर रोजी सर्व विभागप्रमुखांना कागदी कपांवर बंदी घालण्याचे आदेश निर्गमित करून कार्यवाही करण्याबाबतचे पत्र दिले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी हे घातक कप तपासण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासन विभागला दिले होते. त्यानुसार काही सॅम्पल पुणे येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते.

तसेच सुप्रीम कोर्टाच्या आदेशान्वये राज्य सरकारने गंभीर दखल घेत मागील काळात प्लास्टिक वर बंदी आणली होती. त्याच प्लास्टिकचा उपयोग चहा पिण्याच्या कपामध्ये करण्यात आला व



त्यातून मानवी शरीराला असंख्य गंभीर आजार होत असल्याचे समोर आला आहे. म्हणून हाच मुद्दा आझाद हिंद संघटनेचे ॲड. सतीश रोठे यांनी उचलून धरला व जिल्हाधिकारी मार्फत राज्य सरकारला निवेदन केले.

त्यानुसार् जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना आदेशीत करीत आपआपल्या परिसरातील सर्व चहाच्या स्टॉल वरील प्लास्टिक व कागदी कप जप्त करण्याचे आदेश दिले त्यानुसार आता प्रत्येक नगरपलिकेच्या वतीने कारवाई केल्या जात आहे.

### प्रणिती शिंदे वाल्मिक कराडवर संतापल्या, म्हणाल्या, धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या!

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराडवर आरोप केला जात आहे. संतोष देशमुखांच्या हत्येनंतर वाल्मिक कराड फरार होता. मात्र २२ दिवसांनंतर वाल्मिक कराड पुण्याच्या सीआयडी कार्यालयात शरण आला. वाल्मिक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणावरून काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी जोरदार हल्लाबोल केलाय.

## ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी; ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांना लॅपटॉपचे वाटप



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र आणि राज्य शासनाने प्रशासकीय कामकाजात गती आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यामधील एकूण १३ तालुक्यातील कार्यरत ५०४ महसूल अधिकारी व ८९ मंडळ अधिकारी असे एकूण ५९३ लॅपटॉप व ५९३ प्रिंटरचे वाटप जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात हा वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत डिजिटल इंडिया लँड रेकॅार्ड मॉडर्नायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत जमाबंदी आयुक्त कार्यालय यांचे मान्यतेने या साहित्याचे वाटप करण्यात आले.

## ऑनलाईन मिळणारी घरपोच औषधविक्री थांबवा अन्यथा मेडिकल बंद चा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** कोव्हिडचे निमित्त करून घरपोच औषध पुरवण्यासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्मना दिलेल्या विशेष परवानगीचा गैरवापर होत आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. दिलेले आदेश तात्काळ मागे घ्यावा अन्यथा देशभरातील १२ लाख ४० हजार औषध विक्रेते बंद पुकारतील असा इशारा ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट आणि महाराष्ट्र संघटनेने दिला आहे.

संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ आप्पा शिंदे आणि सरचिटणीस राजीव शिंगल यांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सचिवांना पत्र लिहून हा इशारा दिला आहे. याबाबत वाशिम जिल्हा केमिस्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष राजेश पाटील शिरसाट, सचिव नंदकिशोर झंवर यांनी वाशिम जिल्यातून एक प्रसिद्ध पत्रक दिले आहे. कोव्हिडच्या आपतकालीन परिस्थितीत दिलेली परवानगी अद्यापही सुरु आहे.

काही डिजिटल प्लॅटफॉर्मवर नियम क अटीचे पालन न करता घरपोच औषधे पुरवण्यात येत आहेत. यामध्ये प्रिस्क्रीप्शनचीसुद्धा मागणी केली जात नाही. यामुळे स्वचिकित्सा, नशेसाठी औषधांचा गैरवापर आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्ती यासारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. ऑनलाइन प्लॅटफॉर्म त्यांच्या केवळ नफ्याकडे लक्ष देऊन सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष करत आहेत.

महामारीचा टप्पा संपुष्टात आल्याने जुनी अधिसूचना रद्द करावी, औषध विक्री आणि वितरणासाठी सुरक्षा नियम कठोर करावेत, देशभरातील अवैध ऑनलाईन औषध विक्री तात्काळ थांबवावी. ती जर थांबली नाही तर १२ लाख ४० हजार औषध विक्रेते बंद पुकारतील असा इशारा देण्यात आला आहे.

### मोहित कंबोजांनी केला इव्हीएम घोटाळा, उत्तम जानकरांचा सनसनाटी आरोप, भाजप नेत्याचं जोरदार प्रत्युत्तर

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे आमदार उत्तम जानकर यांनी ईव्हीएममध्ये छेडछाड करून महायुतीचा विजय झाल्याचा गंभीर आरोप याआधी केला आहे. आता मोहित कंबोज यांनी ईव्हीएम घोटाळा केल्याचा सनसनाटी दावा उत्तम जानकर यांनी केलाय. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून भाजपचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उत्तम जानकर यांच्यावर पलटवार केलाय. जानकर हे अपघाताने आमदार झालेत, असे विखे पाटलांनी म्हटले आहे. ईव्हीएम मशीनची जबाबदारी मोहित कंबोज यांच्यावर होती आणि त्यांनीच ईव्हीएम घोटाळा केल्याचा आरोप उत्तम जानकर यांनी केला आहे.

# ई-पिक पाहणीसाठी १५ जानेवारीपर्यंत नोंदणी करा

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्प ई-पिक पाहणीची सुरुवात दि. १ डिसेंबरपासून सुरू झाला आहे. यात सातबारावर पिकपेरा स्वतः शेतकऱ्यांनी अँन्ड्राईड फोनद्वारे नोंदणी करावी लागणार आहे. शेतकरीस्तरावर पिक पाहणी करण्यासाठी अंतिम दि. १५ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. त्याअनुषंगाने सर्व शेतकरी बांधवांनी विहित मुदतीत आपल्या पीकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी केली आहे.

रब्बी हंगामी २०२४ ई-पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजरोजी पर्यंत ७ लाख ५६ हजार ५३५ हे. आर. क्षेत्रापैकी १ लाख ४६ हजार ५३२.०४ हे. आर क्षेत्रावर, तसेच एकूण ८ लक्ष ३६ हजार ०३३ पिक पाहणी करावयाच्या खातेदारापैकी १४१९८९ प्लॉटवर सबंधित शेतकऱ्यांनी आपल्या पीकांची ई-पीक पाहणी डिसीएस व्हर्जन ३.० या मोबाईल प द्वारे आपल्या सातबारा वर नोंदणी केलेली आहे. आजवर बुलढाणा जिल्ह्यात डिजटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई पीक पाहणीची नोंदणी १९.३७ टक्के क्षेत्रावर झोलेली आहे. उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकरी बांधावांना ई-पीक पाहणी पद्वारे पीकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पीक पाहणीची नोंदणी ई-पीक पाहणी व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे करतांना न्ड्रॅाईड फोन आवश्यक आहे. सदर ॲप गूगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून घ्यावे. ई पीक पाहणी पद्वारे शेतकरी बांधावर जावुन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करावी. सदर कामी संबंधीत शेतकऱ्याजवळ मोबाईल उपलब्ध नसल्यास, संबंधीत गावाचे तलाठी, कोतवाल तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर यांची मदत घेवून आपल्या पीकांची नोंदणी ई पिक पाहणी ॲप द्वारे करून घेण्यात यावी. सदर पविषयी काही अडचण असल्यास संबंधीत गावाचे तलाठी तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर, आपल्या गावातील डिसीएसकरिता नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी.



ई पीक पाहणी द्वारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या सातबारा वर पीक पेरा कोरा राहील. जो नंतर भरता येत नाही त्यामूळे पीक विमा व इतर शासकीय अनुदान व लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होईल. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गीक आपत्ती या बाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारा वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतातील पहिल्या शिक्षिका, भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या आद्य प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

